N.C.R.B (एन.सी.आर.बी)

I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT

**(Under Section 154 Cr.P.C.)**

प्रथम खबर अहवाल

(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)

1. **District (जिल्हा):** जळगाव **P.S.(ठाणे):** मारवाड

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0006 **Year (वर्ष):** 2023

**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):**24/01/2023 00:47

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** सोमवार **Date From (दिनांक पासून):** 23/01/2023

**Time Period (कालावधी):** पहर 5 **Date To ( दिनांक पर्यंत):** 23/01/2023

**Time From (वेळेपासून):** 14:36 बजे

**Time To (वेळेपर्यंत):** 14:36 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**

**Date (दिनांक ):** 23/01/2023 **Time (वेळ):** 22:25 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**

**Entry No. (नोंद क्र.):** 022

**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 23/01/2023 22:25 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**

उत्तर, 11 किमी **Beat No. (बिट क्र.):**

(b) **Address (पत्ता):** निम ग्रामपंचायत कार्यलयात

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**

**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**

**District(State) (जिल्हा(राज्य)):**

6. **Complainant / Informant** (तक्रारदार/माहिती देणारा):

(a) **Name** (नाव): रविंद्र नानाभाऊ सोनवणे

(b) **Father's/Husband's Name**(वडील / पती चे नाव) :

(c) **Date/Year of Birth** (जन्म तारीख/वर्ष): 1996

(d) **Nationality** (राष्ट्रीयत्व): भारत

(e) **UID No.** (यु.आय.डी. क्र.):

(f) **Passport No.**(पारपत्र क्र.):

**Date of Issue** (दिल्याची तारीख):

**Place of Issue** (दिल्याचे ठिकाण):

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN)** ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address** (पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | राम्हळसर ताशिदखेडा जिधुळे,हमु निम ता अमळनेर जिजळगांव,मारवाड, जळगाव,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | राम्हळसर ताशिदखेडा जिधुळे,हमु निम ता अमळनेर जिजळगांव,मारवाड, जळगाव,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation** (व्यवसाय):

(j) **Phone number** (फोन नं.):

**Mobile** (मोबाइल नं.):

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars** (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | राजेंद्र लक्ष्मण पाटील | | | 1. ता अमळनेर जिजळगांव,रा प्लट नं 18/1,गट नं1400,, मारवाड,जळगाव,महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant** (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):

9. **Particulars of properties of interest** (संबंधीत मालमत्तेचा तपशील):

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|
| 1 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | 25000 रूपये त्यात (500रुपये दराच्या 50 चलनी नोटा) | 25,000.00 |

10 **Total value of property (In Rs/-)**
**(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

25,000.00

11. **Inquest Report / U.D. case No., if any**
**(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12. **First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

फिर्यादी ची फिर्याद की यातील फिर्यीदी यांचा निम ता. अमळनेर शिवारात सुमारे 30 वर्षेपासून वडीलोपार्जीत विट भट्टीचा व्यवसाय आहे.सन 2022 मध्ये फिर्यीदी यांनी त्यांची पत्नी सौ.प्रतीभा रविद्र सोनवणे यांच्या नावे निम शिवारात शेत गट क्र 228/1 क्षेत्रफळ 60आर हि शेतजमीन खरेदी केली आहे.सदर शेत जमीनीवर फिर्यीदी यांना विट भट्टी व्यवसाय सूरू करायचा असल्याने त्यांनी दि.04/01/2023 रोजी तहसिलदार,अमळनेर यांचे नावे आवश्यक असलेली रॉयल्टी रक्कम 6,000/- रूपये ऑनलाईन पध्दतीने भरणा केली होती त्यांनतर निम ग्रामपंचायतीचे ग्रामसेवक यांनी फिर्यादी व त्यांचा भाऊ धंनजय सोनवणे यांना भेटुन तुम्हालाजर निम शिवारात विट भट्टीचा व्यवसाय सुरू ठेवायचा असेल तर त्यासाठी नाहरकत प्रमाणपत्र देण्याचे मोबदल्यात 27,500/- रूपये लाच मागणी केली होती त्या बाबत फिर्यीदी याने दि.17/01/2023 रोजी अँन्टी करप्शन ब्युरो जळगाव कडेस तक्रार दिली होती.

सदर तक्रारीची अँन्टी करप्शन ब्युरो जळगाव पथकाने दि.17/01/2023 रोजी व दि.23/01/2023 रोजी पंचासमक्ष पडताळणी केली असता यातील नमुद आलोसे राजेद्र लक्ष्मण पाटील ग्रामसेवक,निम ग्रामपंचायत ता. अमळनेर जि.जळगांव यांनी फिर्यादी यांच्या पत्नीच्या नावावर असलेले निम शिवारीतील शेतात विट भट्टीचा व्यवसाय सुरु ठेवण्यासाठी नाहरकत प्रमाणपत्र देण्याचे मोबदल्यात फिर्यीदी यांचेकडेस 27,500/- रूपये मागणी करुन त्यापैकी 25,000/- रूपये लाच रक्कम आलोसे यांनी वर नमुद तारीख वेळ व ठिकाणी स्वताहा स्वीकारली म्हणुन गुन्हा.सदरची सविस्तर फिर्यीद यासोबत जोडली आहे.

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2. (केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)**

(1) **Registered the case and took up the investigation:**
**(प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):**

Jayesh Dhudku Khalane(I (Inspector)) / DGPJDKM8801 **or (किंवा)**

(2) **Directed (Name of I.O.) (तपास अधिका-याचे नाव):**

**Rank (पद):** **No.(क्र.):**

**to take up the Investigation (ला तपास करण्याचे अधिकार दिले) or (किंवा)**

(3) **Refused investigation due to (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):**

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.**
(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):

**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

14 **Signature/Thumb impression of the complainant / informant.**
(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

15.**Date and time of dispatch to the court**
(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

पोलीस ठाणे अंमलदार
नांव:- H.Pm रामगुडे
हुद्दा:- PN ब.नं.3722
... पोलीस स्टेशन

**Signature of Officer in charge, Police Station**
(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)

**Name** (नाव): Jayesh Dhudku Khal.
**Rank**(पद): I (Inspector)
**No.**(सं.): DGPJDKM8801

**Attachment to item 7 of First Information Report** (प्रथम खबरीतील मुद्दा क्र. ७ ला जोडपत्र)**: Physical features, deformities and other details of the ( If known / seen )**(संशयीत/आरोपीचे (माहित असलेल्या/पाहिलेल्या) शारीरिक वैशिष्ट्ये, व्यंग आणि इतर तपशील))

| S.No.(अ.क्र.) | Sex (लिंग) | Date/Year of Birth (जन्म तारीक/ वर्ष) | Build (बांधा) | Height (cms.) (उंची(सें. मी.)) | Complexion (रंग) | Identification Mark (s) (ओळखीच्या खुणा) |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 |
| 1 | पुरुष | | | | | चेचक के दाग: NO |

| Deformities/ Peculiarities | Teeth (दात) | Hair (केस) | Eyes (डोळे) | Habit(s) (सवयी) | Dress Habit(s) (पोषाखाच्या सवयी) |
|---|---|---|---|---|---|
| 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 |
| | | | | | |

| Language /Dialect (भाषा / बोलीभाषा) | Place Of (का स्थान) | | | | | Others (इतर) |
|---|---|---|---|---|---|---|
| | Burn Mark (भाजल्याच्य ा खुणा) | Leucoderma (कोड) | Mole (तिळ) | Scar (व्रण) | Tattoo (गोदण) | |
| 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 |
| | | | | | | |

**These fields will be entered only if complainant/informant gives any one or more particulars about the suspect/accused.**
(जर तक्रारदार/माहिती देणा-याने संशयीत/आरोपीविषयी एक किंवा त्यापेक्षा अधिक तपशील दिल्यास फक्त यातील रकान्यांची नोंद घेतली जाईल.)

फिर्याद

मारवड पोलीस स्टेशन

दिनांक. २३.०१.२०२३

**मी रविंद्र नानाभाऊ सोनवणे (कुंभार), वय–२७ वर्षे, व्यवसाय– विटभट्टी,रा. म्हळसर,ता.सिंदखेडा, जि.धुळे. ह.मु.निम, ता. अमळनेर, जि.जळगांव. मो.नं. ९९७०४३१०१२**

समक्ष हजर राहुन फिर्याद देतो की, मी वरील ठिकाणी माझे परिवारासह राहतो.मी दि.१६.०१.२०२३ रोजी सायंकाळी अॅन्टी करप्शन ब्युरो,जळगांव कार्यालयाचे पोलीस उप अधिक्षक श्री.एस.एस.पाटील यांचेकडेस भ्रमणध्वनी व्दारे निम,ता.अमळनेर येथील एका लोकसेवकाविरुध्द लाचे संबधी तोंडी तक्रार केली होती व त्यावेळी मी त्यांना दि.१७.०१.२०२३ रोजी सकाळी १०.०० वा.निम ते तांदळी रोडवर निम गावापासुन २ कि.मी.अंतरावर असलेल्या आमचे शेतातील विटभट्टीवर भेटणार असल्याचे कळविले होते.

त्याप्रमाणे मी दि.१७.०१.२०२३ रोजी सकाळी १०.०० वा. निम ते तांदळी रोडवर निम गावापासुन २ कि.मी.अंतरावर असलेल्या आमचे शेतातील विटभट्टी येथे माझे मोटर सायकल सह उपस्थीत होतो. त्यानंतर काही वेळाने पोलीस उप अधिक्षक श्री.एस. एस.पाटील साहेब,दोन शासकीय पंच व सापळा पथक असे खाजगी वाहनाने सदर ठिकाणी आले. त्यानंतर पोलीस उप अधिक्षक श्री. एस.एस.पाटील साहेब यांनी त्यांची व सोबत असलेल्या दोन शासकिय पंचाची,सापळा पथकाची व माझी ओळख करून दिली. त्यानंतर मला त्यांचे खाजगी वाहनात बसवुन घेतले. तेव्हा मी माझी लाचे संबधीची तक्रार माझे स्वतःचे हस्ताक्षरात पोलीस उप अधिक्षक श्री.एस.एस.पाटील साहेब यांचे कडे लिहून दिली ती पुढील प्रमाणे –

मी वर नमुद ठिकाणी माझे कुटुंबासह राहावयास असुन विटभट्टी व्यवसाय करुन कुटुंबाचा उदर निर्वाह करतो. निम ता. अमळनेर शिवारात आमचा सुमारे ३० वर्षापासुन वडीलोपार्जीत विटभट्टीचा व्यवसाय आहे. सन २०२२ मध्ये माझी पत्नी नामे सौ. प्रतिभा रविंद्र सोनवणे हिचे नावे निम शिवारात शेत गट क्रमांक २२८/१ क्षेत्रफळ ६० आर ही शेतजमिन खरेदी केली आहे. सदर शेतजमिनीवर मला विटभट्टी व्यवसाय सुरु करावयाचा असल्याने त्या अनुषंगाने मी दिनांक– ०४.०१.२०२३ रोजी मा.तहसिलदार यांचे नावे आवश्यक असलेली रॉयल्टीची रक्कम ६,०००/– रुपये ऑनलाईन पध्दतीने भरणा केलेली आहे. त्यानंतर विटभट्टी व्यवसायाचे संदर्भात निम ग्रामपंचायतीचे ग्रामसेवक मला व माझा भाऊ धनंजय सोनवणे अशांना भेटले. तेव्हा त्यांनी मला '' तुला जर तुझ्या पत्नीचे नावे निम शिवारात असलेल्या शेतजमिनीवर विटभट्टीचा व्यवसाय सुरु ठेवायचा असेल तर त्यासाठी तुला लेखी अर्ज देवुन निम ग्रामपंचायतीचे नाहरकत प्रमाणपत्र घ्यावे लागेल व सदर प्रमाणपत्र मिळविण्यासाठी तुला मला २७,५००/– रुपये द्यावे लागतील '' असे सांगीतले होते.

दिनांक– ०७.०१.२०२३ रोजी मी माझे महत्वाचे कामा निमीत्ताने बाहेरगावी गेलो होतो. म्हणुन मी माझा भाऊ नामे धनंजय सोनवणे यास निम ग्रामपंचायत येथे जाऊन नाहरकत प्रमाणपत्र मिळणेकामी करावयाच्या लेखी अर्जा संदर्भात ग्रामसेवक राजेंद्र पाटील यांची भेट घेण्यास सांगीतले होते. त्या अनुषंगाने माझा भाऊ धनंजय सोनवणे हा ग्रामसेवक राजेंद्र पाटील यांना भेटला असता त्यांनी पुन्हा माझे भावाला देखील ''तुम्हाला जर विटभट्टीचा व्यवसाय सुरु ठेवायचा असेल तर त्यासाठी ग्रामपंचायतीचा नाहरकत प्रमाणपत्र घ्यावे लागेल. व सदरचा नाहरकत प्रमाणपत्र देण्याचे मोबदल्यात मला २७,५००/– रुपये द्यावे लागतील'' असे माझे भावाने मला घरी येऊन सांगीतले होते.

तेव्हा माझ्या लक्षात आले की ग्रामसेवक राजेंद्र पाटील हे आमच्याकडे माझे पत्नीचे नावे असलेल्या शेतात विटभट्टीचा व्यवसाय सुरु ठेवण्यासाठी नाहरकत प्रमाणपत्र देण्याचे मोबदल्यात आमचे कडेस २७,५००/–रुपये लाचेची मागणी करत आहेत.

मला ग्रामसेवक राजेंद्र पाटील यांना २७,५००/–रुपये लाचेची रक्कम देण्याची मनापासुन इच्छा नाही. परंतु जर मी त्यांचे मागणी प्रमाणे त्यांना लाच रक्कम दिली नाही तर ते माझे पत्नीचे नावे असलेल्या शेतात विटभट्टीचा व्यवसाय सुरु ठेवण्यासाठी नाहरकत प्रमाणपत्र देणार नाहीत व विटभट्टीचा व्यवसायात अडथळा निर्माण करतील म्हणुन मी त्यांचे विरुद्ध तक्रार देत आहे. ग्रामसेवक राजेंद्र पाटील यांनी सांगितल्या प्रमाणे मी आज दि.१७/०१/२०२३ रोजी माझा भाऊ धनंजय सोनवणे याचेसह निम ग्रामपंचायत कार्यालय येथे ग्रामसेवक राजेंद्र पाटील यांची भेट घेण्यासाठी जाणार आहे. तरी पुढील योग्य ती कार्यवाही होणेस विनंती आहे.

त्यानंतर पोलीस उप अधिक्षक श्री.एस.एस.पाटील साहेब यांनी मला व पंच क्रं. १ यांना थोडक्यात सुचना दिल्या. त्यानंतर पोलीस उप अधिक्षक श्री.एस.एस.पाटील साहेब यांनी त्यांचे कडेस असलेले डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर दाखविले व त्यामध्ये नविन मेमरी कार्ड टाकुन ते सुरु करुन सदरचे मेमरीकार्ड मध्ये माझे व दोन्ही पंचाचे वक्तव्य घेतले व सदरचे व्हॉईस रेकॉर्डर सुरु करुन ते माझे शर्टच्या आत गळयात लटकवुन दिले. त्यानंतर मला, व माझा भाऊ धनंजय सोनवणे यांना पंच क्रं.१ यांचेसह ग्रामसेवक श्री.राजेंद्र पाटील यांची भेट घेण्यासाठी निम ग्रामपंचायत कार्यालय येथे माझे मोटार सायकलने पाठविले होते.

त्यानंतर मी माझा भाऊ धनंजय सोनवणे व पंच क्रं.१ असे सदर ठिकाणाहुन माझे मोटार सायकलने निघुन निम ग्रामपंचायत कार्यालयाचे आवारात पोहचलो. सदर ठिकाणी माझी मोटर सायकल उभी करुन आम्ही ग्रामपंचायत कार्यालयात गेलो असता सदर ठिकाणी ग्रामसेवक श्री.राजेंद्र पाटील हे हजर नव्हते.

तेव्हा मी ग्रामपंचायत कार्यालयात हजर असलेले शिपाई श्री.सुभाष पाटील यांचेकडेस ग्रामसेवक श्री.राजेंद्र पाटील यांचे बाबत विचारणा केली असता तेव्हा त्यांनी आप्पा आलेले नाहीत, म्हणुन मी त्यांना ''आप्पा केव्हा येतील?'' त्या बाबत विचारणा केली असता त्यांनी ''फोन लावुन विचारुन घ्या'' असे सांगीतले. तेव्हा माझा भाऊ धनंजय सोनवणे याने ''मना मोबाईल मा बॅलेंस नाही हे, लावा न तुम्हना नंबर वरुन'' असे सांगीतले असता शिपाई श्री.सुभाष पाटील यांनी त्यांचे मोबाईल वरुन ग्रामसेवक राजेंद्र पाटील यांना फोन केला. तेव्हा त्यांनी ''बोला सुभाष भाऊ'' तेव्हा शिपाई सुभाष पाटील यांनी हा ''ईथना भैय्या बोली राहयना'' असे म्हणाले. तेव्हा भाऊ धनंजय सोनवणे याने शिपाई सुभाष पाटील यांचा फोन घेवुन त्याचा स्पिकर ऑन केला व ग्रामसेवक राजेंद्र पाटील यांना ''ते

आपल मोडी द्या न एनओसी न'' असे म्हणाला. तेव्हा ग्रामसेवक राजेंद्र पाटील हे ''काय मोडी द्या न, मी कुठ नाही म्हणी राहयनु, पैसा लीसन या, पावती फाडा न, एनओसी मोडा'' असे म्हणाले. त्यावर भाऊ धनंजय सोनवणे हा ग्रामसेवक राजेंद्र पाटील यांना ''कितला लई यु पैसा?'' असे विचारले असता ग्रामसेवक राजेंद्र पाटील यांनी ''तुमंन जितला आबान सांगेल हे तितला'' असे म्हणाले. तेव्हा भाऊ धनंजय सोनवणे हा ग्रामसेवक राजेंद्र पाटील यांना ''कितला आपला वीस – पंचवीस, आबा न असे सांगेल हे म्हणे, आप्पान ते बोलण करतील म्हणे तुम्हले'' असे म्हणाला. त्यावर ग्रामसेवक राजेंद्र पाटील हे ''आप्पा न ते बोलण करतील म्हणजे... ते सांगेलच होत ते तं...'' असे म्हणाले. तेव्हा भाऊ धनंजय सोनवणे हा ग्रामसेवक राजेंद्र पाटील यांना हा ''मंग कितला, कितला... वीस हजार, पंचवीस हजार कस काय?'' त्यावर मी ''जाऊ दे... पंधरा हजार सांगेल होतात हया वर्षाना'' असे म्हणालो. तेव्हा ग्रामसेवक राजेंद्र पाटील हे ''नाही,नाही... पंचवीस हजार अधिक अडीच हजार अस साडे सत्तावीस हजार रुपये लागतील....'' असे म्हणाले. त्यावर मी त्यांना ''पंचवीस हजार अन अडीच हजार... साडे सत्तावीस ? नि आपल ते दहा हजार मांघले वर्षाना... अन हया वर्षाना पंधरा, पंचवीस हुई राहनात न...'' असे म्हणालो. तेव्हा ग्राम सेवक राजेंद्र पाटील हे ''हं... मं... अडीच हजार रुपये ते मा पेनल्टी अनं जीएसटी टाकी राहना मी त्यानमा'' असे म्हणाले. त्यावर भाऊ धनंजय सोनवणे हा ग्रामसेवक राजेंद्र पाटील यांना म्हणाला की, '' पंचवीस हजार वेगळा अन त्या अडीच हजार का?'' तेव्हा ग्रामसेवक राजेंद्र पाटील हे '' हां... असा साडे सत्तावीस हजार रुपया लागतीन... हं... हं...'' असे म्हणाले. त्यावर भाऊ धनंजय सोनवणे त्यांना '' ओके के रोज मंग, कुठे हे त आता तुम्ही?'' असे म्हणाला. तेव्हा ग्रामसेवक राजेंद्र पाटील हे ''के रोज म्हणजे तु, के रोज म्हणजे पैसा... अरे पण कव्हा भेटन हे संध्याकायले भेटा मं... '' असे म्हणाले. तेव्हा मी ग्रामसेवक राजेंद्र पाटील यांना ''आढे ऐशात का? निम ले'' असे म्हणालो असता ते ''नाही निमले नाही, अमळनेरलेच ई जा न, ली जा न आढे....'' असे म्हणाले. त्यावर भाऊ धनंजय सोनवणे हा त्यांना '' कितला वाजता ईवुत मंग? बहे जमाले पाहिजे आते... कितला आणु मग? असे म्हणाला. तेव्हा ग्रामसेवक राजेंद्र पाटील यांनी ''संध्याकायले सहा वाजता... जमाले काय हे त... काम तुम्हन हे नं...साडे सत्तावीस हजार रुपये'' असे म्हणाले. तेव्हा मी व भाऊ धनंजय सोनवणे असे ग्रामसेवक राजेंद्र पाटील यांना ''पंचवीस ठराया होतात'' असे म्हणालो. तेव्हा ते ''अरे ते नंतर हाई ठरनात, पेनल्टी ठरनी, जीएसटी सर्वासनीच पैसा दिनात अडीच,अडीच हजार जास्त... हं...'' असे म्हणाले. तेव्हा भाऊ धनंजय सोनवणे त्यांना हं...मं... चालीन मं... साडे सत्तावीस हजार आणस मंग मी... अं... चाली...चाली... ओके तेव्हा ग्रामसेवक राजेंद्र पाटील हे हं... म्हणाले व त्यानंतर भाऊ धनंजय सोनवणे याने फोन कट करुन फोन शिपाई सुभाष पाटील यांना परत करुन मी व पंच क्र.१ असे सदर ठिकाणाहुन निघुन सापळा पथकाजवळ परत आलो होतो. त्यानंतर डिजीटल व्हाईस रेकॉर्डर मध्ये माझे, ग्रामसेवक श्री.राजेंद्र पाटील यांचे सोबत मोबाईल फोनवर झालेले संभाषण दोन्ही पंचानी, पोलीस उप अधिक्षक श्री.एस.एस.पाटील साहेब व सापळा पथकाने ऐकले. तेव्हा ग्रामसेवक राजेंद्र पाटील यांनी माझे पत्नीचे नावे असलेल्या निम शिवारातील शेतात विटभट्टीचा व्यवसाय सुरु ठेवण्यासाठी नाहरकत प्रमाणपत्र देण्याचे मोबदल्यात आमचे कडेस २७,५००/–रुपये लाचेची मागणी केल्याबाबत खात्री झाली. त्यानंतर ग्रामसेवक राजेंद्र पाटील यांनी लाचेची रक्कम घेवुन सायंकाळी ६ वाजता अमळनेर येथे बोलाविले असल्याने पोलीस उप अधिक्षक श्री.एस.एस.पाटील साहेब यांनी पुढील सापळा कारवाई अमळनेर येथे जावुन करण्याच्या निर्णय घेतला.

त्यानंतर सायंकाळी १७.२४ वाजेचे सुमारास मी पोलीस उप अधिक्षक श्री.एस.एस.पाटील साहेब यांचे सांगणे प्रमाणे ग्रामसेवक राजेंद्र पाटील यांचे मोबाईल फोन केला व माझे फोनचा स्पिकर ऑन केला व ग्रामसेवक राजेंद्र पाटील यांना ''अमळनेर मध्ये कुठे भेटायचे? या बाबत विचारणा केली असता त्यांनी ''तु येतांना उतारा घेवुन ये व अमळनेर मध्ये आल्यावर फोन कर'' असे सांगुन फोन कट केला. त्यानंतर पोलीस उप अधिक्षक श्री.एस.एस.पाटील साहेब यांनी डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर सुरु करुन मला ग्रामसेवक राजेंद्र पाटील यांची भेट घेण्यासाठी पंचायत समिती कार्यालय,अमळनेर येथे पाठवले होते. तेथे पोहचल्यानंतर मी ग्रामसेवक राजेंद्र पाटील यांची वाट पाहत असतांना त्यांचा मला फोन आला व त्यांनी मला '' कुठे आहे'' बाबत विचारणा केली. त्यावर मी त्यांना ''पंचायत समिती जवळ असलेल्या चहाचे टपरीवर'' असल्याचे सांगीतले असता त्यांनी मला ''सुभाष चौकाजवळील आंबेडकर पुतळयाजवळ येण्यास सांगीतले'' येण्या बाबत सांगीतले. त्याप्रमाणे मी आंबेडकर पुतळयाजवळ जावुन थांबलो असता ग्रामसेवक राजेंद्र पाटील यांचा पुन्हा फोन आला व त्यांनी मला '' कुठे आहे'' बाबत विचारणा केली असता मी त्यांना पुतळयाजवळ आहे असे सांगीतले. तेव्हा त्यांनी मला '' तुम्ही काही दिसत नाही हे'' जाऊ द्या, नंतर भेटु म्हणुन असे म्हणाले. माझी व ग्रामसेवक राजेंद्र पाटील यांची भेट झाली नाही म्हणुन मी सापळा पथका जवळ परत आलो होतो. त्यानंतर पाटील साहेबांनी माझे कडील डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर ताब्यात घेवुन बंद केले. त्यानंतर मी पाटील साहेब यांना ग्रामसेवक राजेंद्र पाटील हे ज्या दिवशी निम ग्रामपंचायत कार्यालयात येतील त्या दिवशी मी आपणास संपर्क करेल असे सांगितले. तेव्हा पाटील साहेब यांनी मला व दोन्ही पंचाना झालेल्या कारवाई बाबत गोपनियता राखण्याच्या सुचना दिल्या होत्या. तसा सविस्तर पंचनामा केला आहे.

त्यानंतर मला निम ग्रामपंचायत मधील शिपाई सुभाष पाटील यांचे कडून ग्रामसेवक राजेंद्र पाटील हे सोमवार दि.२३.०१.२०२३ रोजी निम ग्रामपंचायत कार्यालयात येणार असल्याचे समजले होते. त्याबाबत मी पाटील साहेब यांना फोन व्दारे कळविले होते.त्याप्रमाणे पाटील साहेब, दोन पंच व सापळा पथक असे दि.२३.०१.२०२३ रोजी सापळा कारवाईसाठी लागणारे साहीत्यासह निम ते तांदळी रोडवर निम गावापासुन २ कि.मी.अंतरावर असलेल्या आमचे शेतातील विटभट्टी जवळ पोहचुन पुढील सापळा कारवाई सुरु केली. त्यानंतर पाटील साहेब यांच्या सुचनेवरुन पोकॉ ईश्वर धनगर यांनी डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर सुरु करुन माझे बनियनच्या आत गळयात दोरीने लटकावुन दिले. त्यानंतर मला, व पंच क्र.१ यांचेसह माझे मोटर सायकलने ग्रामसेवक राजेंद्र पाटील यांच्याशी लाचे संबंधी बोलणी करण्यासाठी निम ग्रामपंचायत कार्यालय येथे रवाना केले.

त्यानंतर मी व पंच क्र.१ असे सदर ठिकाणाहुन माझे मोटार सायकलने निघुन निम ग्रामपंचायत कार्यालयाचे आवारात पोहचलो. सदर ठिकाणी माझी मोटर सायकल उभी करुन आम्ही ग्रामपंचायत कार्यालयात गेलो असता सदर ठिकाणी ग्रामसेवक श्री.राजेंद्र पाटील

हे हजर होते. तेव्हा ग्रामसेवक राजेंद्र पाटील यांचेत व माझे आमचे विट भटटीचे नाहरकत प्रमाणपत्र देण्याचे कामकाजा संदर्भात चर्चा झाली तेव्हा ग्रामसेवक राजेंद्र पाटील यांनी काय बोलणे आहे, काय करणं हे, मी त्या विषयावर, काही बोलणार नाही, मी पैसे आकारले आहे, त्याप्रमाणे तुम्ही देत असला तर मी पावती फाडायला तयार आहे. मी वाद विवाद घालु शकत नाही असे म्हणाले, त्यावर मी त्यांना साडे सत्तावीस जास्त हुई रायनात, असे म्हणालो असता ग्रामसेवक राजेंद्र पाटील यांनी तुम्ही ठरल्या प्रमाणे पैसे देता तर मी पावती फाडायला तयार आहे. मी मराठीत बोलतो आहे. जास्त वाद विवाद घालु शकत नाही असे सांगुन २७,५००/—रु. लाच रक्कमेची मागणी केली. तेव्हा मी त्यांना पैसे घेवुन येतो असे सांगुन मी व पंच क्र.१ असे सदर ठिकाणाहुन निघुन सापळा पथकाजवळ परत आलो होतो. त्यानंतर डिजीटल व्हाईस रेकॉर्डर मध्ये माझे, ग्रामसेवक श्री.राजेंद्र पाटील यांचे सोबत झालेले संभाषण दोन्ही पंचानी, पोलीस उप अधिक्षक श्री.एस.एस.पाटील साहेब व सापळा पथकाने ऐकले. तेव्हा ग्रामसेवक राजेंद्र पाटील यांनी माझे पत्नीचे नावे असलेल्या शेतात विटभट्टीचा व्यवसाय सुरु ठेवण्यासाठी नाहरकत प्रमाणपत्र देण्याचे मोबदल्यात आमचे कडेस २७,५००/—रुपये लाचेची मागणी केल्याबाबत खात्री झाली. मी ग्रामसेवक राजेंद्र पाटील यांना लागलीच पैसे घेवुन येतो असे सांगितले असल्याने व वेळ कमी असल्याने पोलीस उप अधिक्षक श्री.एस.एस.पाटील साहेब यांनी सदर सापळा कारवाई सलग पणे करण्याच्या निर्णय घेतला.

त्यानंतर पोलीस उप अधिक्षक श्री.एस.एस.पाटील साहेब यांनी मला २७,५००/—रु.हजर करण्यास सांगितले. तेव्हा मी माझे जवळ असलेल्या माझे घर खर्चातुन आणलेले २५,०००/—रु त्यात ५००/—रु.दराच्या ५० नोटा पोलीस उप अधिक्षक श्री.एस.एस. पाटील साहेब यांचे समक्ष हजर केले. त्यानंतर पोलीस उप अधिक्षक श्री.एस.एस.पाटील साहेब यांनी मी हजर केलेले २५,०००/—रु त्यात ५००/— रु.दराच्या ५० नोटांना अ.पा.पावडर लावुन सदरच्या नोटांची घडी करुन माझे पॅन्टच्या पुढील उजव्या बाजुच्या खिश्यात अलगद ठेवुन दिल्या होत्या.

त्यानंतर पोलीस उप अधिक्षक श्री.एस.एस.पाटील साहेब यांनी मला व पंच क्र.१ यांना थोडक्यात सुचना दिल्या.त्यांनतर पोलीस उप अधिक्षक श्री.एस.एस.पाटील साहेब यांनी डिजीटल व्हॉईस रेकॉर्डरमध्ये नविन मेमरी कार्ड टाकुन ते सुरु करुन माझे शर्टच्या आत गळयात लटकवुन दिले.त्यानंतर मला, पंच क्र.१ यांचेसह ग्रामसेवक श्री.राजेंद्र पाटील यांची भेट घेण्यासाठी निम ग्रामपंचायत कार्यालय येथे माझे मोटार सायकलने पाठविले होते.

त्यानंतर मी व पंच क्र.०१ असे सापळा पथकापासुन माझे मोटार सायकलने निघुन निम ग्रामपंचायत कार्यालय येथे पोहचलो. तेव्हा पोलीस उप अधिक्षक श्री.पाटील साहेब यांनी सदर ग्रामपंचायत कार्यालयाचे आजुबाजुस सापळा लावला होता. तेव्हा मी व पंच क्र. १ असे ग्रामसेवक श्री.राजेंद्र पाटील यांचे समोर निम ग्रामपंचायत कार्यालयात जावुन उभा राहिलो असता तेव्हा त्यांनी त्यांच्या उजव्या हाताचे पहिले बोट व अंगठयाने लाच रकमे बाबत ईशारा करुन पैसे आणले आहेत का? बाबत विचारणा केली. तेव्हा मी त्यांना मानेने पैसे आणले बाबत होकार दर्शविला. तेव्हा त्यांनी मला नाहरकत दाखला दिला. त्यानंतर मी माझे पॅन्टच्या पुढील उजव्या बाजुच्या खिशात असलेली लाचेची रक्कम २५,०००/— रुपये त्यात ५००/—रु. दराच्या ५० नोटा बाहेर काढुन ''ल्या आप्पा मोजी ल्या'' असे म्हणुन ती लाच रक्कम ग्रामसेवक राजेंद्र पाटील यांचे समोर धरली असता, त्यांनी सदर लाचेची रक्कम त्यांचे उजव्या हाताने स्विकारून, ती लाच रक्कम हातात धरुन व मोजुन टेबलावर ठेवली. मात्र त्याची पावती दिली नाही. त्यानंतर मी लागलीच ठरवुन दिल्या प्रमाणे सापळा पथकास इशारा केला. तेव्हा पोलीस उप अधिक्षक श्री.एस.एस.पाटील साहेब व सापळा पथक यांनी ग्रामसेवक राजेंद्र पाटील यांना लाचेच्या नोटा मोजतांना रंगेहाथ पकडले.

त्यानंतर पोलीस उप अधिक्षक श्री.एस.एस.पाटील साहेब यांचे सुचने नुसार माझे गळयातील डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर बाहेर काढुन ते बंद केले. तेव्हा पोलीस उप अधिक्षक श्री.एस.एस.पाटील साहेब यांनी ग्रामसेवक राजेंद्र पाटील यांना आपली स्वत:ची तसेच सापळा पथकाची ओळख सांगितली. त्यानंतर पोलीस उप अधिक्षक श्री.एस.एस.पाटील साहेब यांनी ग्रामसेवक राजेंद्र पाटील यांना त्यांचे पुर्ण नाव, गांव व पत्ता विचारला असता त्यांनी त्यांचे नाव राजेंद्र लक्ष्मण पाटील, वय—५५, व्यवसाय नोकरी, ग्रामसेवक, निम ग्रमपंचायत,ता.अमळनेर,जि.जळगाव, रा.प्लॉट नं.१८/१,गट नं.१४००,सुरभी कॉलनी, अमळनेर,जि.जळगांव असे सांगितले. त्यानंतर सापळा पथकाने त्यांना ताब्यात घेतले. त्यानंतर पुढील कारवाई अॅन्टी करप्शन ब्युरो, जळगांव येथे करण्यात आली. सदर कार्यालयातील एका रुममध्ये ग्रामसेवक राजेंद्र पाटील, माझे व दोन्ही पंचाच्या हातांची अल्ट्राव्हायलेट बॅटरीच्या प्रकाशात तपासणी केली. त्यानंतरची पुढील उर्वरीत सापळा कारवाई पोलीस उप अधिक्षक श्री.एस.एस.पाटील साहेब यांनी केली आहे. तसा सविस्तर पंचनामा केला आहे.

अशा प्रकारे आरोपी राजेंद्र लक्ष्मण पाटील, वय—५५, व्यवसाय नोकरी, ग्रामसेवक, निम ग्रमपंचायत,ता.अमळनेर,जि.जळगाव, रा.प्लॉट नं.१८/१,गट नं.१४००,सुरभी कॉलनी, अमळनेर,जि.जळगांव यांनी दि.१७.०१.२०२३ व दि.२३.०१.२०२३ रोजी पंचासमक्ष माझे पत्नीचे नावे असलेल्या शेतात विटभट्टीचा व्यवसाय सुरु ठेवण्यासाठी नाहरकत प्रमाणपत्र देण्याचे मोबदल्यात आमचे कडेस २७,५००/—रुपये लाचेची मागणी करुन सदर लाच रक्कमे पैकी २५,०००/—रु. लाच रक्कम आरोपी याने दि.२३.०१.२०२३ रोजी १४.३६ वा. निम ग्रामपंचायत कार्यालयात स्वत: स्विकारली म्हणुन माझी त्यांचे विरुध्द कायदेशीर फिर्याद आहे.

माझी वरील नमुद फिर्याद मी वाचुन पाहिली ती माझे सांगणे प्रमाणे लॅपटॉप संगणकावर टंकलीखीत केली असुन ती बरोबर व खरी आहे.

फिर्यादीची सही

समक्ष

23.1.2023

शशिकांत श्रीराम पाटील
पोलीस उप अधिक्षक
अॅन्टी करप्शन ब्युरो,जळगांव